**प्रेस नोट**

स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली दिनांक - २०.०६.२०२०

| पो.स्टे /अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटना ता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचेनाव |
|---|---|---|
| आरमोरी अप.क्र. १६४/२०२०<br>कलम ६५(अ),९८(क),८३<br>महा.दारुबंदी अधि. | मौजा आरमोरी बर्डी<br>**घटना ता. वेळ** :-<br>दि.२०/०६/२०२० चे ०२:३० ते ०३:४५ वा.पर्यंत | फिर्यादी सरकारतर्फे पोउपनि भागवत कदम नेम.स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय,गडचिरोली<br>**पाहीजे आरोपीतांचे नाव** :-<br>१) तुफानसिंग राजुसिंग पटवा रा. देसाईगंज २) राहुल कैलास टेंभुर्णे ३) प्रविण भाऊराव खोब्रागडे ४) गुड्डु रेकचंद ठवरे असे तिन्ही रा. आरमोरी ता. आरमोरी जि. गडचिरोली |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैधदारु मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहिती वरुन | पोउपनि. भागवत कदम ,सफौ/७८७ दादाजी करकाडे, पोहवा/१४६१ नरेश सहारे पोशि/५३५४ सुनिल पुठ्ठावार | |

गडचिरोली जिल्हयातील अवैध दारुविक्री तसेच बेकायदेशीर दारु वाहतुकीस आळा बसावा याकरीता मा.श्री.शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु—जुगार व ईतर अवैध व्यवसायांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशीर कार्यवाही करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना दिनांक २०/०६/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी सा. गडचिरोली यांचे आदेशाने पोलीस पथक दारुरेड कामी मौजा आरमोरी परिसरात गस्त करीत असताना पोलीस पथकास गोपनिय सुत्रांकडुन माहीती मिळाली कि, मौजा आरमोरी बर्डी, तसेच देसाईगंज येथील वरील नमुद ठोक दारु विक्रेते हे अवैध देशी दारु पुरवठा करणार आहेत अशा खबरेकरुन मा.डॉ.मोहीत कुमार गर्ग अपर पोलीस अधिक्षक(प्रशासन)यांना माहीती देवुन त्यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडील वरील नमुद पोलीस पथक हे अवैध दारु रेड कारवाई करीता दोन स्थानिक पंचांना सोबत घेवुन मिळालेल्या माहीतीचे आधारे आरमोरी बर्डी परीसरात शोध घेत असतांना मिळालेल्या माहितीच्या प्रमाणे आरमोरी बर्डी येथील ठोक दारु विक्रेता राहुल टेंभुर्णे याचे घराजवळील रोडवर जाऊन आपआपले अस्तीत्व लपवुन पाळत ठेवली असता त्यादरम्यान एक चारचाकी वाहन राहुल टेंभुर्णे याचे घराजवळ येऊन थांबली असता आम्ही पोलीस व पंच असे आपआपले अस्तीत्व लपवुन वाहनाजवळ गेलो असता आम्हा पोलीसांना व पंचाना पाहुन वर चारही नमुद इसम हे त्याचे ताब्यातील चारचाकी वाहन व अवैध दारुचा मुद्देमाल सोडुन घटनास्थळावरुन अंधाराचा फायदा घेऊन पळुन गेले. त्यांचा पाठलाग केला असता ते मिळुन आले नाही. तेव्हा पंचांनी पळुन जाणाया चारही ईसमास नावानिशी ओळखुन सांगीतले की ते १) तुफानसिंग राजुसिंग पटवा रा. देसाईगंज २) राहुल कैलास टेंभुर्णे ३) प्रविण भाऊराव खोब्रागडे ४) गुड्डु रेकचंद ठवरे असे तिन्ही रा. आरमोरी ता. आरमोरी जि. गडचिरोली हे असुन त्यानंतर घटनास्थळी जावुन पंचाच्या उपस्थितीत वाहनाची पाहणी केली असता वाहनात पुढीलप्रमाणे अवैध दारुसाठा मिळुल आला. १) किंमत ३,१२,०००/- रुपये टायगर देशी दारु संत्री ५०००० कंपनीच्या ९० मिली मापाच्या ३९ पेटया २)किंमत ८८,०००/- रुपये देशी दारु सुप्रीम नं १ कंपनीच्या ९० मिली मापाच्या ११ पेट्या ३)किंमत ५,५०,०००/-रुपये ची अवैध दारु वाहतुकीकरीता वापरलेली एस.एक्स ४ मारुती सुझुकी कंपनीची चारचाकी वाहन क्रमांक एम.एच.३१-सीआर- ०३२२ असा आहे. असा **एकुण ९,५०,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल** घटनास्थळावरुन जप्ती करुन

ताब्यात घेवुन गुन्हयातील आरोपीतांना विरुध्द पोलीस स्टेशन आरमोरी येथे वरील नमुद कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सध्या संपुर्ण देशात कोवीड-१९ या साथीच्या रोगाची आपत्तीजनक परीस्थीती निर्माण झालेली असुन महाराष्ट्र राज्यात लॉकडाऊन असल्याने सदरचे कालावधीत अवैध दारुविक्री व बेकायदेशीर दारु वाहतुक होणार नाही. याकरीता स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक अहो रात्रो अवैध दारु रेड मोहीम राबवुन प्रभावीपणे कारवाई केली आहे.स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडुन गडचिरोली जिल्हयात होत असलेल्या प्रभावी कारवाई मुळे अवैध दारुविक्री करणारे तसेच बेकायदेशीर रित्या दारुची वाहतुक करणाया लोकांचे धाबे दणानले आहे.

